# आमचे धर्ममत आणि मिशन

सृष्टीतील प्रत्यके कणांत वसणाऱ्या, सर्वव्यापी, अनंत आणि दिव्य अशा विशेषतः प्रत्यके मानवाच्या हृदयात राहणाऱ्या देवावर आमची निखालस श्रध्दा आहे. या देवामुळे साधकांनाच्या ठिकाणी प्रेम, आनंद आणि ज्ञान निर्माण होते आणि सर्व भूतमात्रांप्रती आदर उत्पन्न होतो. प्रत्येक प्राणिमात्राचे शरिर हे ईश्वरचे मंदिर आहे म्हणूनच परमेश्वराची भक्ती हे प्रत्येक मानवाचे आद्य कर्तव्य आहे. परमेश्वराची ही भक्ती सजीव प्राणिसृष्टीतील प्रत्येकाची सेवा करण्याने आणि आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याने प्रत्यक्षात येते.

दिव्यत्वाची पूजा करण्याची प्रेरणा देणे हा देवी मंदिरचा प्रमुख्य उद्देश आहे. साधू आणि ऋषींचे उदाहरण अनुसरण करणयाची इच्छा उत्पन्न करणे हे आमचे लक्ष्य आहे. साधू आणि ऋषी हे केवळ ऐतिहासिक उदाहरणे नाहित. तुम्ही डोळे उघडे ठेऊन आजूबाजूला पाहिलेत तर आजही हे महात्म्ये तुम्हाला दिसतील. असे महान आत्मे आम्हाला श्रीमाँच्या आणि स्वामी सत्यानंद सरस्वतींच्या रूपात दिसतात. त्यांनच्या अनुसरणाने आम्ही आध्यात्मिक होऊन आमच्या अस्तित्वाचा उद्देश साध्य करू शकतो.

पुढील पिढीसाठी आमच्यपैकी काही साधू आणि ऋषीं होतील. सनातन धर्मचे शास्त्र विराट असून तसे अपुर्णही आहे आपल्यापैकी प्रत्येकजण या धर्मशास्त्रात स्वतःच्या जीवन जाणीवेने आणि स्वानुभुतीच्या उदाहरणाने कायम भरच टाकीत असतो.